**19वे प्रवासी भारतीय दिवस संमेलन**

19वे प्रवासी भारतीय दिवस (पीबीडी) संमेलनासाठीची वेबसाईट (pbdindia.gov.in) 11 नोव्हेंबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे, माननीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री श्री सुवेंदू अधिकारी यांच्या हस्ते संयुक्तपणे सुरू करण्यात आली. 19वे पीबीडी संमेलन पश्चिम बंगाल सरकारच्या भागीदारीत जानेवारी 7-9, 2027 दरम्यान कोलकाता, पश्चिम बंगालमध्ये आयोजित केले जाईल.

2. प्रवासी भारतीय दिवस संमेलन हा भारत सरकारचा प्रमुख कार्यक्रम आहे. जगभरातील परदेशस्थ भारतीयांसोबत संवाद साधण्यासाठी महत्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. दरवर्षी 9 जानेवारी रोजी साजरा केला जाणारा प्रवासी भारतीय दिवस, 9 जानेवारी 1915 रोजी महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत येणे या घटनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. 19 व्या पीबीडी संमेलनातून परदेशस्थ भारतीयांना त्यांची कामगिरी साजरी करण्यासाठी, भारतासोबत त्यांचे संबंध मजबूत करण्यासाठी आणि देशाच्या प्रगती व विकासामध्ये त्यांच्या निरंतर सहभागासाठी आणि योगदानासाठी मार्ग शोधण्यासाठी एकत्रित केले जाईल.

3. 19व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाची संकल्पना, 'मुळांकडे परतणे: परदेशस्थ भारतीयांचा भारताशी असलेला संबंध पुन्हा प्रज्वलित करणे', ही संकल्पना परदेशस्थ भारतीयांचे त्यांच्या मातृभूमीशी असलेले सखोल सभ्यताविषयक, सांस्कृतिक आणि भावनिक बंध साजरे करते आणि या चिरंतन संबंधांना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करते. याचा उद्देश परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या पुढच्या पिढीसाठी अशा अर्थपूर्ण संधी निर्माण करणे हा देखील आहे, ज्याद्वारे त्यांना आपली मुळे पुन्हा शोधता येतील, भारताशी पुन्हा जोडले जाता येईल आणि समकालीन भारतासोबतचा त्यांचा संबंध अधिक दृढ करता येईल.

4. तीन दिवसीय संमेलन युवा प्रवासी भारतीय दिवसासह सुरू होईल. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी या संमेलनाचे उद्घाटन करतील. भारताच्या माननीय राष्ट्रपती, श्रीमती द्रौपदी मुर्मू, समापन सत्राचे अध्यक्षस्थान भूषवतील आणि प्रतिष्ठित प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कार प्रदान करतील. हे पुरस्कार त्यांच्या संबंधित क्षेत्रात परदेशस्थ भारतीयांच्या सदस्यांचे अपवादात्मक योगदान आणि जागतिक समुदायासोबत भारताचे संबंध मजबूत करण्यात त्यांच्या भूमिकेला मान्यता देतात.

5. पीबीडी वेबसाईटसह पीबीडी विशेष भारत को जानिए (बीकेजे) प्रश्नमंजुषा देखील सुरू करण्यात आली. ही सुधारित प्रश्नमंजुषा अनिवासी भारतीय आणि परदेशी नागरिकांपर्यंत आपली पोहोच वाढवण्यासाठी अत्याधुनिक गेमिंग तंत्रज्ञानाचा उपयोग करते, तसेच सहभागींना भारताचा वारसा, संस्कृती, कला आणि समकालीन कामगिरीशी जोडते. बीकेजे प्रश्नमंजुषा भारतव्हर्स ॲप आणि वेबसाईटवर (www.bkjquiz.com) उपलब्ध आहे. हे एक '24x7 सदैव कार्यरत' असणारे डिजिटल

सार्वजनिक मुत्सद्देगिरीचे व्यासपीठ असून, यात प्रश्नमंजुषा, कोडी, शब्दकोडी, शब्द शोधणे, अंदाज लावण्याचे खेळ आणि अशा अनेक परस्परसंवादी घटकांचा समावेश आहे. पीबीडी विशेष प्रश्नमंजुषा 11 नोव्हेंबर ते 20 डिसेंबर 2026 पर्यंत चालेल. अनिवासी भारतीय (एनआरआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) आणि परदेशी नागरिक अशा तीन श्रेणींमधील विजेत्यांना भारतात 10 दिवसांच्या विशेष दौऱ्यासाठी आमंत्रित केले जाईल; तसेच ते कोलकाता येथे होणाऱ्या प्रवासी भारतीय दिवस (पीबीडी) उत्सवातही सहभागी होतील.

6. पीबीडी वेबसाईट (pbdindia.gov.in) सुरू झाल्यामुळे, या संमेलनात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही वेबसाईट संभाव्य सहभागींसाठी एक सर्वसमावेशक माहिती आणि सुविधा मंच म्हणून काम करेल; याद्वारे परिषदेचा तपशील, कार्यक्रम, नोंदणी प्रक्रिया, निवास व्यवस्था, लॉजिस्टिक्स आणि सहभागासाठी आवश्यक असलेल्या इतर संबंधित बाबींची माहिती उपलब्ध करून दिली जाईल.

नवी दिल्ली

11 नोव्हेंबर 2026